■ मंगळवार । दि. ७ मे २०१९

■ PRABHAAT । प्रेस रजिस्ट्रेशन नं. १६३९/१९५७, वर्ष ८८, अंक : १२४ ।

प्रभात

प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे

# बहुतांश शाळा 'शत-प्रतिशत'

## सीबीएसई निकालात पुण्याची घोडदौड सुरूच : अनेक शाळांचा निकाल १००%

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ६ - केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) जाहीर केलेल्या दहावीच्या परीक्षेच्या निकालात पुण्यातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले आहे. शहरातील बहुतांश शाळांचा निकाल १०० टक्के लागला असून, पुण्यातील शाळांनी यशाची परंपरा कायम राखली आहे.**

### ज्ञान प्रबोधिनीचा १०० टक्के निकाल



स्पृहा सरनाईक

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेचा निकाल १०० टक्के लागला आहे. स्पृहा सरनाईक ही विद्यार्थिनी ९८.२ टक्के मिळवून शाळेत पहिली आली. विद्यार्थ्यांच्या निकालाची सरासरी ९२.०५ आहे. एकूण ८० मुले परीक्षेला बसली होती. ६१ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळाले आहेत. तसेच, विखे-पाटील मेमोरियल स्कूलचा निकाल १०० टक्के लागला आहे. आयुषी बर्वे ही विद्यार्थीनी ९८.२ टक्के मिळवून शाळेत पहिली आली आहे. १४६ विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली होती.

भुकुम येथील संस्कृती शाळेचा निकालही १०० टक्के लागला आहे. केशवनगरच्या द ऑरबिस प्रशालेचाही १०० टक्के निकाल लागला. परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांपैकी ५० टक्के विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले. त्यात कवाना अंकलेकरने ९६.६ टक्के गुणांसह प्रथम स्थान मिळविले आहे.

**वानवडी येथील सिटी इंटरनॅशनल स्कूल :** शाळेचा निकाल १०० टक्के लागला आहे. जान्हवी ऋषिकेश हिने ९७.१ % गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. परीक्षेस बसलेल्या एकूण ८४ विद्यार्थ्यांपैकी २० विद्यार्थी ९० टक्क्यांच्या वर गुण मिळवून गुणवत्ता यादीत आले आहेत. २५ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवून शाळेचे नाव उंचावले आहे. तसेच १९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. जान्हवी ऋषिकेश हिने गणितात १०० पैकी १०० गुण मिळवलेले आहेत.

### लोकसेवा ई-स्कूलचा निकाल १०० टक्के

लोकसेवा ई-स्कूलचा दहावीचा सीबीएसई बोर्डाचा १०० टक्के निकाल लागला असून १८ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळाले आहेत. १८ विद्यार्थ्यांना ८० ते ८५ टक्क्यांदरम्यान गुण मिळाले आहेत. परीक्षेसाठी एकूण ५४ विद्यार्थी बसले होते. एका विद्यार्थीनीला हिंदीमध्ये १०० पैकी १०० गुण मिळाले असून गणितात ९८, विज्ञानामध्ये ९८, इंग्रजीमध्ये ९६ गुण मिळवून शाळेचे विद्यार्थी प्रथम आले आहेत. संस्थेचे अध्यक्ष दीपक पायगुडे, संचालिका निवेदिता मडकीकर, प्राचार्या रेणुका दत्ता व संयोजक वैशाली वैष्णव यांनी सर्व गुणवंतांचे अभिनंदन केले आहे.

**गोयल गंगा स्कूल**

गोयल गंगा इंटरनॅशनल स्कुलचा निकाल १०० टक्के लागला आहे. आदित्य खानोलकर याने या परीक्षेत सर्वाधिक ९६.६ % टक्के संपादन करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून परीक्षेला बसलेल्या ११४ विद्यार्थ्यांपैकी ८२ टक्के विद्यार्थ्यांनी डिस्टींकशन मिळविले आहे. तर ४२ विद्यर्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवले आहेत.

**सेंट जोसेफ शाळेचे यश**

खळद येथील सेंट जोसेफ इंग्लिश मीडियम स्कूल व जुनिअर कॉलेज दहावीचा निकाल शंभर टक्के लागला आहे. शाळेतील ८६ विद्यार्थी परीक्षेत बसले होते. अथर्व सतीश कारकर याने ९५.६ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला आहे. आदित्य राजेंद्र जगताप याला ९५.२ टक्के (द्वितीय), हर्षवर्धन सोपान जगदाळे याला ९४.८ टक्के (तृतीय) व समृद्धी पोपट मेमाणे ९४.२ टक्के (चतुर्थ) गुण मिळाले आहेत. शाळेच्या व्यवस्थापिका रेव्हइंड सिस्टर व्हिक्टोरिया, प्राचार्य गीतांजली व्यवहारे, अनुराधा पोरे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. वर्गशिक्षक पौर्णिमा धावडे, शिक्षक उद्धव कांबळे, मरुदयराज, पौर्णिमा म्हस्के, लक्ष्मी वाघमारे, स्मितल हेंद्रे, योगिता, यशोधा, पल्लवी कूल, आनंद रामदास, आयझॅक या शिक्षकांचा मोलाचा वाटा ठरला.

> यंदाच्या वर्षापासून ८० परीक्षेचे गुण आणि २० टक्के अंतर्गत अशी पद्धत सीबीएसई बोर्डाने लागू केली होती. त्यामुळे यंदा निकाल कमी लागेल, अशी अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्ष निकाल कमी होण्याऐवजी वाढला आहे. शाळेचा विचार करता यापूर्वी विद्यार्थ्यांची सरासरी उत्तीर्णांची टक्केवारी ८९ टक्के होती. यावर्षी मात्र ९२ टक्क्यांवर गेली आहे. अर्थात, हा निकाल अनपेक्षित म्हणावा लागेल.
>
> **मिलिंद नाईक,** मुख्याध्यापक, ज्ञान प्रबोधिनी प्रशाला

### महापालिकेच्या शाळेचा सलग पाचव्या वर्षीही १०० टक्के निकाल

**पुणे, दि. ६ -** आर्थिक दुर्बल घटकांमधील विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक ठरलेल्या महापालिकेच्या राजीव गांधी ई-लर्निंग स्कूलने केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (सीबीएसई) घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेच्या निकालात यंदाही शंभर टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. शंभर टक्के निकालाचे हे पाचवे वर्ष आहे.

पुणे महापालिकेच्या माध्यमातून सुरू केलेल्या या स्कूलने यंदाही निकालात बाजी मारली आहे. एकूण ५५ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. सर्वांनी उत्तम गुण प्राप्त करीत स्कुलचे नाव उज्ज्वल केले आहे. सृष्टी चिंतल हिला ८७ टक्के तर आदर्श दोंतुल ८२.८ टक्के , प्रियंका मिसाळ ८२.६ टक्के असे गुण मिळवून यश मिळवले आहे. यापूर्वी या शाळेतून जेईई-मेन्स मध्ये तसेच आयआयटीमध्ये विद्यार्थी टॉपर आले आहेत. तर 'नासा'साठी विद्यार्थ्यांचीही निवड झालेली आहे. या यशाबद्दल आयुक्त सौरभ राव यांनी विद्यार्थ्यांने, शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.